कृषी दिनाच्या औचित्याने विशेष......

# “थेट शेतकऱ्याच्या बांधावर” एक अभिनव मोहिम

**डॉ. प्रशांत राऊत**
प्रकल्प समन्वयक, वसंतराव नाईक मानवी विकास संशोधन व प्रशिक्षण संस्था (वन्हार्टी), नागपूर

कृषिप्रधान देशातील महाराष्ट्र हे एक कृषिप्रधान राज्य. शेती आणि शेतकरी हे औद्योगिकरणाचे तसेच संपूर्ण मानवी जीवनाचे एक अविभाज्य घटक मानले जातात. जगाचा पोशिंदा मानला जाणारा अन्नदाता शेतकरी जर वर्षभर शेतात अहोरात्र राबूनही उपाशी राहत असेल, शेतकरी आत्महत्या थांबत नसेल तर निश्चितच हि बाब चिंताजनक आहे.

आजच्या नव्या पिढीचा त्याचबरोबर गावखेड्यात, तांडावाड्यात देखील आज शेतीकडे पाहण्याचा कल नकारात्मक होत आहे. अन्नधान्य सर्वांना हवे आहे. शॉपिंग मॉल मध्ये खरेदी करताना ‘कॉटन ड्रेस’ हवाय म्हणून दुकानदाराला मोठ्या अदबीने सांगावेसे वाटते. पण अन्नदाता शेतकऱ्याप्रति कृतज्ञता व्यक्त करता येत नाही. आजच्या बहुतांश युवावर्गाला शहरात पानटपरी, हातठेला, पकोडा गाडी सारखे उद्योग करायला आनंदाने तयारी दाखवेल, परंतु घरची शेती कसण्यात किंवा गावातील शेतात काम करण्यास कमीपणा वाटतो. हे ‘ॲन्टीॲग्री’ वातावरण निर्माण होत असताना शेतकऱ्यापुढे अनेक प्रश्न ठाण मांडून आहेत. मानसशास्त्रीयदृष्ट्या शेतकऱ्यांचे मनोधैर्य पुर्णत: खचल्याचे दिसून येते. जनमाणसात मिळणारी वागणूक, शेतकऱ्याकडे पाहण्याचा इतरांचा निगेटिव्ह कल यामुळे आपण एकटे असल्याची भावना अन्नदाता शेतकऱ्यामध्ये निर्माण होत आहे.

इन्स्टाग्राम, फेसबूक, यु ट्युब, ट्वीटर, व्हॉटसॲप, पिझ्झा, बर्गरच्या दुनियेत वावरणाऱ्या युवा पिढीला शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न याची अनुभूती कशी होणार? फ्रेन्डशिप डे, व्हॅलेंटाईन डे अशा नाना तऱ्हेच्या दिवशी न चुकता गुलाब आणि चॉकलेट देऊन प्रेम व्यक्त करणाऱ्या डिजीटल पिढीला कृषिप्रधान राज्याचा पावनपर्व कृषिदिन कसा माहित असणार? आपल्यासाठी वर्षभर राबणाऱ्या अन्नदाता शेतकऱ्याची कृतज्ञता कशी उमजणार? शेती आणि शेतकऱ्यांना सन्मानाचा दर्जा बहाल करणारी उदारता पुढे यायला हवी. शेतकऱ्यांचे दु:ख, वेदना समजून त्याला आपलेसे मानणारी भावना उदयास यावी. या हरित संवेदनामधून शेती आणि शेतकऱ्याविषयी निर्व्याज जिव्हाळा जपणारे विदर्भातील वन्हार्टीच्या सदस्यांनी बळीराजा कृतज्ञतेची “थेट शेतकऱ्याच्या बांधावर” हि अभिनव संकल्पना देशात पहिल्यांदाच रुजवली.



१ जुलै कृषिदिन हा नव पेरणीच्या वर्षा ऋतूच्या रिमझिम सरीत धरणीमातेच्या ओलाव्याने अंकुर येणारा हरितपर्वातला कृषिप्रधान राज्याचा सन्मानाचा पावनपर्व म्हणून ओळखला जातो. शेतकरी, शेतमजूराचा पावनपर्व असणाऱ्या कृषिदिनाच्या औचित्याने देशात पहिल्यांदाच “थेट शेतकऱ्याच्या बांधावर” हि बळीराजा कृतज्ञता व सक्षमीकरणाची मोहिम, या मोहिमेचे प्रवर्तक वन्हार्टीचे सदस्य यांच्या संकल्पनेतून गतवर्षी

'चांदा ते बांदा' राबविण्यात आली. एरवी अवमानाने, नापिकीने हतबल झालेल्या, पेरणीच्या संघर्षाने होरपळून निघणाऱ्या बळीराजा शेतकऱ्याचा सन्मान समुपदेशन व सहाय्यता बघुन स्वत: बळीराजा बांधावर गहिवरल्याचे सुखद प्रसंग अनुभवायला मिळाले. मनोधैर्य खचलेल्या शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर 'हरितवसंत' फुलवणारी हि कृषिप्रधान राज्याला व देशाला खुप काही सांगणारी अशी स्तुत्य संकल्पना होय.



भारतीय शेती आणि शेतकऱ्याच्या आस्थेचा प्रेरणादर्श व्यक्तीमत्व म्हणून जर कोणाकडे पाहिले जात असेल, तर ते म्हणजे शेतकऱ्याचे कैवारी आणि शेतकऱ्याच्या पायात काटा जरी रुतला तरी अश्रू ढाळणारा, शेतकऱ्याला जीवापाड जपणाऱ्या वसंतराव नाईक साहेबांच नाव दृष्टीस येते. हरितक्रांतीचे, कृषिऔद्योगिक क्रांतीचे जनक वसंतराव नाईक म्हणायचे, "शेती संपन्न झाली तरच लोकशाही संपन्न होईल. शेती मोडली तर, लोकशाही मोडेल म्हणून शेती आणि शेतकरी टिकले पाहिजेत." आज याच 'कृषिवसंत' विचाराने सर्वांनी कृषिधर्म जपण्याची नितांत गरज आहे. नाईक साहेबांनी भारतीय शेती आणि कृषि औद्योगिकीकरणाला एक प्रेरक आयाम दिले. १९७२ सारख्या भिषण दुष्काळावर मात करून महाराष्ट्राला सुजलाम सुफलाम बनवले. शेती आणि शेतकऱ्याची जीवाभावाची नाती जोडून त्यांना सन्मानांच जीवन दिलं. म्हणूनच तर १९६४ व १९७२ सारख्या भिषण दुष्काळातही शेतकरी जगला. देशापुढे एक आदर्श म्हणून कृषिक्षेत्रात पुढे आला.

महाराष्ट्राने देशाला अनेक प्रेरणादायी अभिनव प्रयोग, संकल्पना दिल्यात. हे महाराष्ट्राच एक वैशिष्ट्यच मानावे लागेल. त्याचाच एक प्रत्यय म्हणजे "थेट शेतकऱ्याच्या बांधावर" हि शेतकरी कृतज्ञेतची अभिनव संकल्पनेचा उल्लेख करावा लागेल.

या मोहिमेत थेट शेत शिवारात बळीराजा शेतकऱ्याची कृतज्ञता व्यक्त करण्यापुरती ही संकल्पना मर्यादित नसून शेती व शेतकऱ्यांना सन्मानाचा दर्जा मिळून देणारी आहे. त्यासाठी आधुनिक कृषितंत्रज्ञान, पिक व्यवस्थापन, समुपदेशन, मनोबल विकास, मोफत फळझाड भेट आणि पाल्यांना शैक्षणिक मदत ह्या बाबी यामध्ये अंतर्भुत आहेत.

आज प्रत्येक व्यवसायाला दर्जा व सन्मान आहे. परंतु देश कृषिप्रधान असूनही शेती आणि शेतकऱ्याला दर्जा व सन्मान का नाही? हे सत्य आजच्या तरुण शेतकऱ्यामध्ये पहायला मिळते. परंतु "थेट शेतकऱ्याच्या बांधावर" हि संकल्पना हरित प्रथा म्हणून रूढ झाल्यास शेतकऱ्याचे कैवारी वसंतराव नाईक साहेबांना कृषिदिनाची खरी आदरांजली ठरेल शिवाय शेती व शेतकऱ्यांना इतर व्यवसाय व व्यवसायिकाप्रमाणे दर्जा असल्याची आत्मभावना शेतकऱ्यामध्ये निर्माण होईल. वाढते औद्योगिकरण जागतिकीकरण व तंत्रज्ञानाच्या धुमश्चक्रीत आपण एकीकडे विकसीत जरी होत असेल, परंतु अन्नधान्याशिवाय दुसरे पर्याय नाही म्हणून शेतकरी जगण अपरिहार्य आहे. शेतकऱ्याबद्दल मायेचा ओलावा निर्माण करुण त्यांना दिलासा देण्यात आणि कृतज्ञता व्यक्त करुन आत्मबळ देण्यात "थेट शेतकऱ्याच्या बांधावर" हि मोहिम क्रांतिकारक ठरू शकेल.

(संपर्क: +९१ ९९२१२८४०७६)

★★★